स्थायी समितीच्या **गुरुवार दिनांक 17–03–2016** रोजी **सायंकाळी 04–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. बंडू उर्फ सुधीर राऊत** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 3. | मा. श्री. राजू भाऊराव नागूलवार | सदस्य |
| 4. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 5. | मा. श्री. जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| 6. | मा. श्रीमती संगीता कळमकर | सदस्या |
| 7. | मा. श्री. रामदास गुडधे | सदस्य |
| 8. | मा. श्री. संजय महाकाळकर | सदस्य |
| 9. | मा. श्री. सुरेश जग्यासी | सदस्य |
| 10. | मा. श्रीमती कुमूदिनी कैकाडे | सदस्या |
| 11. | मा. श्रीमती इफ्तीखर अशरफू | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. सौ. नयना गुंडे, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 03</u>:– प्रभाग क्र. 4 ब यादवनगर स्विपर कॉलोनी येथील नाला भिंतीचे बांधकामास्तव प्राप्त १० निविदांपैकी मे. राजेश श्रवण रंगारी यांची प्राकलनिय दरांपेक्षा ३२ प्रतिशत ने कमी दरांची रू. २६,१३,६४८/– (अक्षरी सव्वीस लक्ष तेरा हजार सहाशे अठ्ठेचाळीस रूपये) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन दर पृथकरण करावे तसेच या दरात प्रस्तावित कार्य योग्य पद्धतीत कार्यशील होऊ शकते का या स्पष्टीकरणासह सादर करावे या सूचनेसह विषय कार्यालयास परत कराण्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 04</u>:– प्रभाग क्र २३ ब मधील फ्रेन्डस कॉलनी मधील बोर नाल्याच्या भिंतीचा बांधकाम करण्याचे कामास्तव व प्राप्त निविदा पैकी मे. राजेश रंगारी यांची निम्नतम निविदा मूळ प्राकलनीय दरापेक्षा १.००% कमी दराची निविदा राशी रू. २८,७०,९४३/– ( अठ्ठाविस लक्ष सत्तर हजार नऊशे त्रेचाळीस फक्त ) रक्कमेच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 05:–** नागपूर शहरातील अस्तीत्वातील व नविन मोबाईल टॉवर्स प्रस्तावासंदर्भात मदतनीस/निर्धारण एजंसी म्हणून त्रयस्थ संस्था मे. ए.आर.कम्युनिकेषन टेलीवेन्चर, तिसरा माळा, दिवान प्लाझा लोकमत चौक जवळ रामदासपेठ नागपूर यांना ठाणे महानगरपालिका मधील नियुक्ती चे धर्तीवर त्यांचे दि.27.10.2015 चे पत्रात व खालील टिप मध्ये नमूद सेवा ते नागपूर महानगरपालिकेला कुठलेही शुल्क न आकारता विनामुल्य देणार असल्याने त्यांची या कामाकरीता नियुक्ती करण्याची बाब स्थायी समीतीव्दारे नोंद घेण्याचे प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने नोंद घेतली.

टिप :–

1. Agency will help to collect all the documents as per Maharashtra & Central Govt. GR / Guideline ,documents list respects to Infrastructure Services provider (IP) & Telecom operators as per instruction from NMC.
2. Agency will help NMC to do telecom tower site assessment .
3. Agency will help to visit with NMC at actual mobile tower site and verify the tower area, shelter area, DG area, total area used in sq. ft. for respective site and submit the information to NMC.
4. Agency will help NMC to get structural Certificate of mobile tower building certified by structural engineer.
5. Agency will help NMC to get actual site photograph along with warning banners at actual site.
6. Agency will help NMC for Verifying and list the fire safety equipment's installed at mobile tower site.
7. Agency will help NMC to get one complete summery diagram showing all the details and size for used area, tower area, height of tower, DG area etc.
8. Agency will help NMC for proper verification of equipment's details used at site.
9. Agency will help NMC to collect contact details of Technician, supervisor and zonal head related to respective site.

**ठराव क्रमांक 06:–** नागपूर शहराकरीता सिमेंट कॉक्रिट रोड फेज–II अंतर्गत, पॅकेज–3 अंतर्गतील (1)महात्मा गांधी कॉर्पोरेशन शाळा टी पॉईंट ते एल.ए.डी. कॉलेज चौक (2) गायत्री मंदीर रोड (डी.पी. रोड) दक्षिण अंबाझरी रोड ते रिंग रोड आय. टी. पार्क मागे (3) टेकडी रोड रामनगर चौक ते उत्तर अंबाझरी मार्ग पर्यंत सिमेंट कॉक्रिट रस्ता करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. दिशा डायनामीस बिल्डवेल प्रा.लि. यांची मुळ प्राकलनीय दरांपेक्षा 10.4 प्रतिशत कमी दराची रू. 117823027/– दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 07:–** स्थायी समीती पारित ठराव क्र. ६२५ दि. ०९. ०२.२०१६ दि. ०९.०२.२०१६मध्ये अटी व शर्थी मधील अट क्र. १ मध्ये खालील नमुद बदल संदर्भात फेरमंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न तसेच,

ठराव क्र. ६२५ दि. ०९.०२.२०१६ मध्ये अट क्र. १ मध्ये शांतीनगर शाळेच्या परिसरातील महानगरपालिकेच्या मालकिच्या तिन इमारती शांतीनगर पोलीस स्टेशन करीता ११ महिन्यांचे अस्थायी भाडेतत्वावर MMC Act १९४९ चे कलम ७९ (c), (d) अन्वये देण्याकरीता तीन्ही इमारतींचे एकुण भाडे रु. ९७,१९५/– (रु. सत्त्यान्नव हजार एकशे पंच्यान्नव) प्रतीमाह नुसार ११ महिन्याचे एकुण भाडे रु.

१०,६९,१४५ (रु. दहा लाख एकोणसत्तर हजार एकशे पंचेचाळीस) आगाऊ महानगरपालिका, नागपूर येथे जमा करावा लागेल, असे नमुद आहे.

याऐवजी सदर जागा पोलीस स्टेशन वापराकरीता ११ महिन्याचे अस्थायी भाडेपट्ट्यावर द्यावयाची असल्याने, प्रथम दोन महिन्याचे भाडे महानगरपालिका, नागपुर कडे जमा करणे तसेच उर्वरीत नऊ महिन्यांचे भाडे हे तीन महिन्यांचे टप्प्याने जमा करावे लागेल, या अटींवर तात्पुरता ताबा देण्यात येईल.

ठराव क्र. ६२५ दि. ०९.०२.२०१६ चे ठरावातील इतर अटी मागील मंजुरीनुसारच राहतील.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 08ः– 1) सरंक्षण मंत्रालय, भारत सरकार यांना डिफेन्स सर्विसेसकरीता ऑप्टीकल फायबर केबल (OFC) टाकण्याचे निश्चीत केले असून संरक्षण विभागाच्या विनंतीवरून, महाराष्ट्र शासनाने परिपत्रक क्र. संकिर्ण–2015/प्र.क्र.412/नवि–20 मंत्रालय मुंबई, दि. 21 डिसेंबर 2015 अनुसार राज्यातील मार्गाच्या हक्काचे (ROW) शुल्क पूर्णतः माफ करण्याचा तसेच राज्यातील क्षेत्रीय कार्यालयांनी देण्यात येणारी मोफत 2mbps क्षमतेची जोडणी माफ करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या पार्श्वभुमीवर नागपूर शहर हद्दीत म.न.पा रस्त्यांवर डिफेन्स सर्विसेस सरंक्षण मंत्रालय, भारत सरकार यांना 21237 मी. लांबीच्या ऑप्टीकल फायबर केबल (OFC) टाकण्यासाठी ROW शुल्क पुर्णतः माफ करून परवानगी देण्यात मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 09ः– प्रभाग क्र. ६२ (अ) येथील महालक्ष्मी नगर वस्त्या मधील पावसाळी पाणी पाईप लाईन टाकण्याचे कामास्तव मागविण्यात आलेल्या एकूण १२ निविदाकारा पैकी मे. विश्वदिप इन्टरपाईजेस यांची प्रथम निम्नतम निविदा मुळ प्राकलनीय दरापेक्षा २३.८९ टक्के कमी दराच्या निविदा राशी रू. २६,५०,६७८/– रकमेच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 10ः– प्रभाग क्र. 12 येथील इंदोरा बौद्ध विहार व यात्रीनिवास बेझनबाग येथील नविनिकरण व विस्ताराची कामे "ब" वर्ग तिर्थक्षेत्र अंतर्गत करण्यास्तव रु. 2,00,00,000/– रकमेचा ढोबळ प्राकलनाप्रमाणे म.न.पा. च्या वित्तीय सहभागा करीता मंजूरी व या कामास्तव में. भिवगडे ॲंड असोसिएटस यांची प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार म्हणून नेमणूक करण्याचा प्रश्न विचारात घेणे त्याचप्रमाणे तिर्थक्षेत्रातील विकास कामाचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्याचा प्रश्न तसेच शासन निर्णय क्रमांक तिक्षेवि–2002/568/प्र.क्र.89/2002/नवि–18 दिनांक 24.08.2014 तीर्थक्षेत्रांची निवड करणे आणि तिर्थक्षेत्र विकास योजनांचे आराखडे मंजूर करणे याबाबतचे निकषानुसार "ब" श्रेणीतील स्थळांच्या बाबतीत तीर्थक्षेत्राच्या आराखडयाच्या एकूण खर्चाच्या 50% रक्कम शासनाने, 25% रक्कम संबंधीत स्थानिक नागरी संस्थेने व 25% रक्कम संबंधीत मंदिराच्या ट्रस्टने/संस्थेने खर्च करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 11</u>ः– दक्षिण नागपूर विधानसभा क्षेत्रातील प्रभाग क्र. 49 येथिल राजाबाक्षा हनुमान मंदिर 'ब' तीर्थक्षेत्र म्हणून विकसित करण्याकरीता शासन निर्णय क्र. तिक्षेवि.–2002/568/प्र. क्र. 89/02/नवि 18 दि. 24.08.2004 चे अनुषंगाने खालील प्रश्न तसेच,

1. ब' तीर्थक्षेत्र म्हणून विकसित करण्याकरीता लागणारा एकूण खर्चापैकी शासनाचे 50 टक्के, ट्रस्ट/संस्थेचे 25 टक्के व महानगरपालिकेचे 25 टक्के वित्तीय सहभागाकरीता मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
2. महानगरपालिकेच्या सन 2016–17 च्या अंदाजपत्रकात तीर्थक्षेत्राच्या विकास कामाकरीता तरतूद उपलब्ध करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
3. ब' तीर्थक्षेत्र विकसित करण्यास्तव, रू. 5,37,39,088/–रकमेचे प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करून या कामास्तव मे. भिवगडे ॲण्ड असोसिएशन यांची ''प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार'' म्हणून नेमणूक करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
4. म.न.पा.चे जागेवर प्रस्तावित विकास कामाचे देखभाल व दुरूस्तीची कामे म.न.पा. तर्फे करण्यास्तव मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 12</u>ः– प्रभाग क्र. 16 अ येथील रामसुमेरबाबा नगर वस्तीत रस्त्यांचे डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. पी.के.कन्स्ट्रक्शन यांची मूळ प्राकलनीय राशी रु. 29,98,544/– पेक्षा वाटाघाटीनंतर 3.50 टक्के जास्त दराची रु. 31,03,493/– ची निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न विचारात घेणे, हे काम पद क्र. 681 (A22001330802) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी पर्यंत सिमीत ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 13</u>ः– प्रभाग क्र. ४२–अ महाल येथे गजानन मंदिर ते फरसुले आणि श्री जयस्वाल ते हनुमान मंदिर व पाण्याच्या टाकी जवळ सिमेंट कॉंक्रिट रोडचे बांधकामास्तव प्राप्त १७ निविदांपैकी मे. संतोष आर. खरपकर यांची प्राकलनिय दरांपेक्षा १८.९६ प्रतिशत ने कमी दरांची रू. ३२,४१,३९७/– (अक्षरी बत्तीस लक्ष एकेचाळीस हजार तिनशे सत्यान्नव रूपये) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 14</u>ः– माननीय महापौर हयांनी दि.१२.०२.२०१५ रोजी महाल रोगनिदान केंद्र येथे संपन्न झालेल्या सभेत दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिका, नागपूर येथील आरोग्य विभागात मानसेवी तज्ञांच्या नेमणुकीचे निकष ठरविण्याकरीता मा.उपसंचालक(आरोग्य) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सभेत

मानसेवी तज्ञांच्या नेमणुकीकरीता प्रस्तावित अटी व शर्ती मधील प्रमुख मुद्दयावर खालील प्रमाणे निकष ठरविण्यात आले.

१) **शैक्षणिक पात्रता :-** आरोग्य विभागात मानसेवी तज्ञांना नेमणुक देतांना फिजीओथेरेपी व दंत चिकित्सेकरीता संबंधीत ठरावात पदवीका अभ्यासक्रम उतीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र मान्यता प्राप्त महाराष्ट्र परिषदेचे असणे बंधनकारक राहील. तसेच ॲलोपॅथीक तज्ञांकरीता संबंधीत ठरावात पदव्युत्तर अभ्यासक्रम उतीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

२) **वयोमर्यादा :-** आरोग्य विभागात सेवानिवृत्त डॉक्टरांना मानसेवी तंज्ञ म्हणुन सेवा देता यावी तसेच सेवा काळात त्याच्याकडे असलेला दिर्घ अनुभवाचा फायदा रुग्णांना मिळावे या उद्देशाने मानसेवी तज्ञांच्या नेमणुकी करीता वयाच्या ७० वर्षांपर्यत काल मर्यादा करण्यात यावी असे ठरले. सेवानिवृत्त डॉक्टरांना नेमणुक देतांना त्यांची शारीरीक व कार्यक्षमता असणे आवश्यक राहील.

३) **मानधन :-** म.न.पा.त मानसेवी तज्ञ म्हणुन सेवा देत असलेल्या तज्ञांना सध्या रु.२५००/- द.म. मानधन मिळत आहे. मानधन रु.२५००/- वरुन रु.५०००/- द.म. करण्याचे ठरविण्यात आले.

४) **कामाची वेळ :-** मानसेवी तज्ञांना दर आठवडयात सहा तास काम करावे लागेल. त्यांच्या कार्यालयीन कामाचे विभाजन सहा दिवसामध्ये दररोज एक तास किंवा तीन दिवस २ तास प्रमाणे करण्यात येईल तसेच संबंधीत इंचार्जाना दवाखान्याच्या आवश्यकतेनुसार त्यांच्या वेळा ठरवुन देता येईल तसेच वेळेवर बदल सुध्दा करता येईल.

सबब मानसेवी तज्ञांच्या नेमणुकी करीता ठरविण्यात आलेल्या अटी व शर्ती मधील प्रमुख ४ मुद्दयावरील निकष तयार करण्यात आले. हि वित्तीय बाब असल्यामुळे पान क्रमांक ३ वर असलेली संपूर्ण अटी व शर्तीचा मसुदा मा.अध्यक्ष, स्थायी **समिती यांचे मान्यतेस्तव सादर केलेला** प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 15</u>:— वाडी ऑक्ट्राय नाका स्थित मनपाच्या सुलभ शौचालयाचे संचालन, देखभाल व दुरूस्तीकरिताच्या करारनामास मुदतवाढ देणेबाबत.

वाडी ऑक्ट्राय नाक्याजवळ ''पैसे द्या व वापरा'' या तत्वावर सुलभ शौचालय बांधण्याचे व त्याचे 30 वर्षाकरिता संचालन व देखभाल करण्याचे काम सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हिस आर्गनायझेशन या संस्थेस करारनामा दि. 13 मार्च 1985 नुसार देण्यात आले होते.

करारनाम्याप्रमाणे शौचालयाच्या संचालनात दि. 12.03.2015 रोजी 30 वर्ष पुर्ण होत असल्यामुळे या शौचालयाच्या पुढील कालावधी करिता संचालक संस्थेची नियुक्ती संदर्भात निर्णय घेणे आवश्यक आहे.

मागील 30 वर्षाच्या संचालन कालावधीत संचालक संस्थेने म.न.पा. कडुन कोणतीही मदत अपेक्षीली नाही किंवा मागीतलेली नाही. त्याचप्रमाणे सुलभ शौचालयाची देखभाल यथायोग्य करून वास्तु सुस्थितीत राखली आहे. सुलभ इंटरनॅशनल या संस्थेचे या क्षेत्रातील कार्य तथा महानगरपालिकेतील त्यांचे द्वारा

संचालित इतर सुलभ शौचालयांच्या देखभालीचा अनुभव लक्षात घेता या संस्थेस मा. स्थायी समितीच्या मान्यतेस पुढील जास्तीत–जास्त 10 वर्षाकरिता उक्त शौचालय संचालन व देखभालीस खालील अटींवर मंजुरी देण्याचा प्रश्न तसेच

1) संबंधीत संस्थेस सुलभ शौचालयाचे संचालन व देखभालीबाबतचा करारनामा करावा लागेल.
2) संबंधीत संस्थेस शौचालयांच्या इमारतीची आवश्यक दुरूस्ती/डागडुजी करून, सर्व त्रृट्या दुर करून, नविनीकरण करावे लागेल.
3) शौचालयास कोणत्याही नविन सुविधा निर्माण करण्याची संस्थेस आवश्यकता भासल्यास त्यासंदर्भात संस्थेस म.न.पा.ची रितसर परवानगी घ्यावी लागेल.
4) संबंधीत संस्थेस सार्वजनिक शौचालयाची इमारत संचालन व देखभालीकरिता जास्तीत–जास्त 10 वर्षाकरिता देण्यात येईल. या कालावधी दरम्यान उपरोक्त जागेची महानगरपालिकेस कोणत्याही विकास प्रकल्पाकरिता आवश्यकता असल्यास संस्थेस इमारत त्वरीत रिकामी करून द्यावी लागेल.
5) उपरोक्त प्रमाणे मंजुर कालावधीनंतर संबंधीत शौचालयाचे संचालन व देखभाल बाबतच्या करारनाम्याचे नुतनीकरण करण्याचे सर्व अधिकार महानगरपालिकेचे राहतील.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 16</u>ः– महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक सेवा संचलनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व महानगरपालिका नागपूर व विदर्भ कबड्डी संघटना यांचे संयुक्त विद्यमाने ''छत्रपती शिवाजी चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा'' दिनांक 17 मार्च ते 20 मार्च 2016 या कालावधीत ''रा.पै.समर्थ स्टेडियम'' येथे आयोजित आहे. या स्पर्धेचा एकूण खर्च रु. 51,96,150/– इतका अपेक्षित असून या स्पर्धेकरिता रु. 35 लक्ष ''महाराष्ट्र शासन'' द्वारा मंजूर असून बाकीचा अतिरिक्त अपेक्षित रु. 16,96,150/– खर्च महानगरपालिकेला वहन करावा लागणार आहे. उपरोक्त प्रस्ताव स्थायी समितीकडे वित्तीय भुगतान करण्यासाठी मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 17</u>ः– प्रभाग क्र. 48, रेशिमबाग, वकीलपेठ ते सिरसपेठ (उमरेड रोड) येथील अंदाजित 40 ते 50 वर्ष जुनी सिवर लाईन जागोजागी फुटलेली असल्याने, तातडीने नवीन सीवर लाईन टाकण्याचे कामास्तव विशेष बाब म्हणून मंजुरी घेवून काम करण्यात आले आहे. करिता या कामाचे विभागातर्फे तयार करण्यात आलेल्या रू. 5,39,273/– राशी चे प्राकलनास कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 18</u>ः– कारखाना विभागातर्फे 3 नग जेटिंग कम सक्शन मशिन (8000 लि. क्षमता) खरेदीकरिता इ–निविदा मागविण्यात आली असता मे. Aryan Pumps & Enviro Solutions Pvt.Ltd. यांचे निम्नतम दर (रु. 1,27,11,150/–) प्राप्त झाले असून प्राकलनीय दरापेक्षा 9.85% कमी आहेत. मे. Aryan Pumps & Enviro Solutions Pvt.Ltd. यांच्या सोबत दराबाबत झालेल्या वाटाघाटी नंतर त्यांनी दि. 02.03.2016 च्या पत्रान्वये निविदा दर रु. 1,27,11,150/– पेक्षा 0.5% कमी

दर रु. 1,26,47,594/– मध्ये 3 नग सक्शन कम जेटिंग मशिन पुरविण्यास हमी दिली आहे.

करीता मे. Aryan Pumps & Enviro Solutions Pvt.Ltd. यांच्या कडून 3 नग जेटिंग कम सक्शन मशिन (8000 लि. क्षमता) रु. 1,26,47,594/– मध्ये खरेदी करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 19ः– नागपूर शहराकरीता सिमेंट कॉंक्रिट रोड फेज–II अंतर्गत, पॅकेज–06 अंतर्गतील रस्ता क्र. 06 – रामेश्वरी रोड, आंबेडकर चौक ते रिंग रोड पर्यंत, रस्ता क्र. 31–त्रिशरण चौक ते प्रगती कॉलोनी रोड ते रिंग रोड बॅनर्जी ले–आऊट मधून जाणारा रस्ता पर्यंत, रस्ता क्र. 33–बालाजी नगर नाला ते वेनू कॉर्नर पर्यंत, रस्ता क्र. 53–भगवान नगर शाळा ( वेनू कॉर्नर ) ते बालाजी नाला हया पर्यंत रस्ता सिमेंट कॉंक्रिट चा तयार करण्याकरीता अर्हता प्राप्त 05 पात्र निविदापैकी मे. आरपीएस इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा.लि. यांची प्राकलनीय दरांपेक्षा 16.27 टक्के कमी दराची रू. 14,70,56,547/– रकमेची सुधारीत निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 20ः– प्रभाग क्र. 55 अ अंतर्गत प्रतापनगर, कोतवालनगर, अंत्रे ले–आऊट, उर्वेला कॉलोनी येथील रस्त्याचे डांबरीकरणाचे काम करण्यास्तव प्राप्त मे. अमृत कन्स्ट्रक्शन यांची मूळ प्राकलनीय राशी रु. 29,99,980/– ची निविदा 3.50 प्रतिशतने अधिक दराची रु. 31,04,979/– रकमेची सुधारित निम्नतम निविदा स्वीकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 21ः– हनुमान नगर झोन क्र. 03, प्रभाग क्र. 67 ब अंतर्गत ओंमकार नगर चौक ते चिंतामणी नगर नं. 2 येथे 9 मी. ऑक्टॉग्नल पोलवर 250 वॅट सोडीयम फिटिंग लावून प्रकाश व्यवस्था करण्याकरीता ई–निविदा बोलविल्या असता, प्राप्त सात (७)निविदांपैकी मे. साधना इलेक्ट्रीक वर्क्स, नागपूर यांची रू. ३२,८६,५२५/– ची प्राकलनीय दरापेक्षा २२.१२ टक्के ने कमी असलेली निम्नतम दराची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 22ः– प्रभाग क्र. 27 आग्याराम देवी चौक ते गणेश घाट पर्यंत सुभाष रोड येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. ओ.जी. बजाज हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 4.90 टक्के अधिक दराची निविदा रूपये 65,52,731/– रकमेची निम्नतम निविदा स्थायी समिती ठरावाचा ठराव क्र. 99 दिनांक 19.06.2015 स्विकृत करण्यात आलेली होती तथापी सदरहु रस्त्याचे कामाचा C.C. Road Phase -II
या योजनेत अंर्तभाव केलेला असल्यामुळे या कामाऐवजी मौका बदल करून गणेशपेठ येथील कुंभलकर कॉलेज येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याकरीता त्याच कंत्राटदारांमार्फत 4 टक्के अधिक दर 64,96,511/– हया दरावर सुधारीत मंजूरी तसेच कामाचा मौका बदलाच्या प्रस्तावास मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 23ः—** प्रभाग क्र. 17 ‘‘अ’’ झाडे चौक बस्तरवारी येथे सि सि. रोडचे प्रभाग क्रमांक 17 ब प्रेमनगर येथे रस्ता डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. पी.एम.ए. कन्स्ट्रक्शन यांची वाटाघाटीनंतर प्राकलनिय दरापेक्षा 3.50 टक्के प्रतिशतने जास्त असलेली रु. 31,04,777/— रकमेची निम्नतम निविदा स्वीकृत करण्याचा तसेच अतिरिक्त तरतूद मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 24ः—** मोबाईल टॉवर उभारणी संदर्भात केंद्र शासनाच्या दि. 08/08/2013 रोजीच्या दूरसंचार विभागाच्या मार्गदर्शक सूचना तसेच राज्य शासनाच्या शासन निर्णय क्र. टिपीएस — 1810/1975/ प्र. क्र. नवीन 65/12/वियो/नवि—13 दि. 04/03/2014 रोजीच्या नवीन विनियमानूसार तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई, येथे दाखल याचिका क्र. 2043/14 व 2047 /14 मधील आदेशाच्या अनुषंगाने मोबाईल टॉवर उभारणी प्रकरणी मंजूरीची कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे. परिशिष्ठ ‘अ’ ‘ब’ व ‘क’ नस्तीत संलग्न आहे. त्याप्रमाणे मार्गदर्शक सूचना/विनियम / आदेश यांचे अनुषंगाने कार्यवाही करण्याची बाब स्थायी समितीद्वारे नोंद घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन एकमताने नोंद घेतली. तसेच मनपा महासभेची नोंद घेण्यास्तव प्रस्तावित विषय सभागृहा समोर पाठविण्यात यावा यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 25ः—** प्रभाग क्र. ४२ अ आणि ब किल्ला येथे जुना पुस्तक बाजार ते संघ बिल्डींग चौक व शिवराज डेकोरेशन ते किल्ला येथे सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त ८ निविदांपैकी मे. संतोष आर. खरपकर यांची प्राकलनिय दरांपेक्षा १.१ टक्के प्रतिशत ने कमी दरांची रू. ५६,५१,०८५/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 26ः—** प्रभाग क्र. ४१ महाल येथे डॉ. केशव बळीराम पंत हेडगेवार अभ्यासिका व ई लायब्ररी तयार करण्याचे कामास्तव तयार केलेल्या **रू. १,२३,३७,५५१/—** (अक्षरी एक कोटी तेवीस लक्ष सदतीस हजार पाचशे एक्कावन रूपये) रकमेच्या ढोबळ प्राकलनास जूने पद क्र. ५६१ व नविन पद क्र. A45600272905 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच प्रथम टप्प्यात रू. 71,18,147/— रकमेचे स्थापत्य कामास्तव व विद्युत विभागाचे रू. 9,94,850/— रकमेचे कामास्तव निविदा मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 27:–</u> प्रभाग क्रं. ३५, भांडेवाडी डंपीग टी पॉईंट पासून बिडगावकडे जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. एस. के. मेहता ॲन्ड कंपनी, यांची प्राकलनीय दरापेक्षा २.५३ टक्के अधिक दराची रू. १,०८,११,१५९/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 28:–</u> नागपूर शहराकरीता सिमेंट कॉक्रिट रोड फेज–II अंतर्गत, पॅकेज–08 अंतर्गतील रस्ता क्र. 40–सक्करदरा तलाव पासुन ते दत्तात्रय नगर पर्यंत, रस्ता क्र. 48–सक्करदरा सी.सी.रोड ते लक्ष्मीदेवी बजाज आयुर्वेदिक दवाखान्या पर्यंत, रस्ता क्र. 54–गजानन शाळेपासुन (बसवेश्वर पुतळा) ते उदयनगर चौक रिंग रोड पर्यंत, रस्ता क्र. 55–गजानन शाळेपासुन ते म्हाळगी नगर चौका पर्यंत रस्ता सिमेंट कॉक्रिट चा तयार करण्याकरीता अर्हता प्राप्त 08 निविदापैकी मे. आरपीएस इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा.लि. यांची प्राकलनीय दरांपेक्षा 16.27 टक्के कमी दराची रू. 13,18,96,326/– रकमेची सुधारीत निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 29:–</u> महानगरपालीकेच्या कर आकारणी विभागातील अभिलेखांचे (नस्त्या) स्कॅनिंग करण्याकरीता प्रती पृष्ठ रू.1.30 या दराने स्थायी समीतीने दि.23.12.2011 च्या सभेतील ठराव क्र. 198 अन्वये डेकोफर्न कंट्रक्शन यांच्या निवीदेला मंजुरी प्रदान केलेली होती.

संबधीत एजन्सी मे. डेकोफर्म कंट्रक्शन यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाची दोन वर्षाची मुदत दि. 26.12.2013 रोजी पुर्ण झालेली आहे. सदर एजन्सीने केलेल्या कामाचा तपशिल व एजन्सीला देण्यात आलेला व देय असलेला खर्च खालील प्रमाणे आहे.

| अ.नु | तपशील | करण्यात आलेले स्कॅनिंगचे काम (एकुण पृष्ठ) | कंत्राटदारास देण्यात आलेले देयक |
|---|---|---|---|
| 1) | कराराचे मुदतीपर्यत करण्यात आलेले काम व खर्च | 1,08,23,246 | रू. 1,54,84,964 |
| 2) | कराराचे मुदतीनंतर, झालेली कामे व खर्च | 21,07,954 | रू. 30,15,618 |
| 3) | प्रलंबित देयक व त्यावरील खर्च | करण्यात आलेले स्कॅनिंग चे काम | देय असलेली रक्कम |
| | | 50,09,090 | रू. 74,23,471 |

वरील विवरणानुसार एजन्सीने एकुण 1,79,40,290 पृष्ठांचे स्कॅनिंगचे कार्य पूर्ण केले असुन झालेल्या कामाचे एकुण देयक रू. 2,59,24,053 पैकी एजन्सीला रु. 1,85,00,582 चे भुगतान करण्यात आलेले आहे उर्वरीत रू. 74,23,471 एवढया रकमेचे भुगतान करणे शिल्लक आहे. सदर्हु प्रकरणाकरिता वित्त विभाग म.न.पा. चे प्राप्त अभिप्राय ज्ञापन पृष्ठ क्र. 52, 53, टाचन आहे. संबंधीत विभागाच्या अभिप्रायानुसार खालील बाबी करिता प्रस्तावित करण्यांत येत आहे.

एजन्सीने सादर केलेल्या मुदतवाढीचा अर्ज विचारात घेउन त्यांनी केलेल्या एकुण आठ झोन च्या कर आकारणी अभिलेखांच्या एकुण 1,79,40,290 पृष्ठांच्या स्कॅनिंग करीता येणारा एकुण खर्च रू. 2,59,24,053 या खर्चास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न, तसेच उर्वरीत दोन झोनच्या कर आकारणी अभिलेखांच्या दस्तावेजाच्या स्कॅनिंगचे अंदाजे एकुण 35,00,000 पृष्ठांचे स्कॅनिंगचे कार्य रू. 1.30 या दरावर संबधीत एजन्सीला देउन याकरीता येणारे एकुण खर्च रू. 45,50,000 या रकमेस मान्यता प्रदान करण्याचा तसेच सदर्हु कामे करुन घेण्यात दिनांक 31 जुलै 2016 पर्यंत मुदतवाढ देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

हा उपरोक्त खर्च पद क्र. A2 90 006 226 04 जी.आय.एस. सर्वेक्षण व स्कॅनिंग करणे या पदाअतंर्गत करण्यात येईल.

ठराव क्रमांक 30 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर